आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२३ ऑक्टोबर २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी वंचित आणि मागास समुदायाला समान संधी मिळणं आवश्यक असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन

- भारत निर्मित ‘आकाश’ क्षेपणास्त्राच्या खरेदीत ६ ते ७ देशांना रस

- बिहारमधे मुख्यमंत्रीपदासाठी महाआघाडीचे उमेदवार तेजस्वी प्रसाद यादव

- भाऊबीजेच्या सणाचा सर्वत्र उत्साह

- महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या साखळी फेरीत, आज भारत विरुद्ध न्यूझीलंड सामना नवी मुंबईत रंगणार

**आणि**

- ॲडलेड एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारताचं ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी २६५ धावांचं आव्हान

**<><><><>**

विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी समाजाच्या सर्व घटकांना विशेष करून वंचित आणि मागास समुदायाला समान संधी मिळणं आवश्यक आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सांगितलं. केरळमधल्या राजभवनात माजी राष्ट्रपती के आर नारायणन् यांच्या पुतळ्याचं राष्ट्रपतींच्या हस्ते अनावरण झालं, त्यावेळी त्या बोलत होत्या.

**- - होल्ड - बाईट - -**

के. आर. नारायणन् यांनी प्रामाणिकपणा, करुणा आणि उच्च लोकशाही मूल्यांचा वारसा ठेवला असल्याचं त्यांनी सांगितलं. नारायणन् यांनी राष्ट्र निर्माण आणि सर्वसमावेशक देशाच्या निर्मितीसाठी आपलं आयुष्य समर्पित केलं, असंही त्या म्हणाल्या. शिक्षण हाच समाजाच्या विकासाचा आधार आहे, यावर नारायणन् यांचा दृढ विश्वास होता असा उल्लेख त्यांनी केला.

**<><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग आज नवी दिल्ली इथं होणाऱ्या द्वैवार्षिक नौदल कमांडर्स परिषदेला संबोधित करणार आहेत. आपल्या भाषणात संरक्षणमंत्री २०४७ पर्यंत व्यापक राष्ट्रीय हितसंबंध आणि विकसित भारताचं व्हिजन डॉक्युमेंट सादर करतील. काल सुरू झालेली तीन दिवसांची परिषद ऑपरेशन सिंदूरनंतर नौदलाची भविष्यातली युद्धसज्जता आणि तयारीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

<><><>

भारत निर्मित 'आकाश' क्षेपणास्त्र खरेदी करण्यासाठी ६ ते ७ देश प्रयत्नरत असून आर्मेनियासोबत 'आकाश', 'पिनाक' आणि १५५ mm तोफांसारख्या संरक्षण साहित्याचे करारही झाले असल्याची माहिती संरक्षण मंत्रालयाच्या सूत्रांनी दिली आहे. या करारानंतर ब्राझीलसह इजिप्त, व्हिएतनाम, फिलिपीन्स आणि युएई या देशांनी देखील आकाश क्षेपणास्त्राच्या खरेदीत रस दाखवला असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

ऑपरेशन सिंदूर दरम्यान आकाश क्षेपणास्त्राच्या प्रभावी कामगिरीमुळे पाकिस्तानवर विजय मिळवणं सुलभ झालं, आणि ते जगानं पाहिलं आहे. आखाती देश, आसियान भागातील राष्ट्रं आणि इतर बाजारपेठांमध्ये आकाशची मागणी वाढण्याची शक्यता आहे, असा अंदाजही संरक्षण मंत्रालयाच्या सूत्रांनी व्यक्त केला आहे.

<><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी 'मेरा बूथ, सब से मजबूत' उपक्रमांतर्गत आज संध्याकाळी दूरदृश्य प्रणालीमार्फत भाजपा आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत. बिहार निवडणूकांमध्ये विजयाची खात्री करण्यासाठी भाजपा आणि आघाडीचे कार्यकर्ते अभूतपूर्व उर्जा आणि समर्पणानं काम करत आहेत, असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><>

बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीसाठी विरोधी पक्षांच्या महाआघाडीनं राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी प्रसाद यादव यांना मुख्यमंत्री पदाचा उमेदवार म्हणून घोषित केलं आहे. पाटणा इथं आज महाआघाडीच्या सर्व सात घटक पक्षांची संयुक्त पत्रकार परिषद झाली. त्यावेळी काँग्रेसचे नेते आणि निवडणूक निरीक्षक अशोक गेहलोत यांनी ही घोषणा केली.

महाआघाडी सत्तेत आली तर विकासशील इन्सान पार्टीचे प्रमुख मुकेश सहानी उपमुख्यमंत्री असतील अशी घोषणाही त्यांनी केली.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीत मात्र अद्यापही मुख्यमंत्री पदाच्या चेहऱ्याबाबत अस्पष्टता असल्याची टीकाही गेहलोत यांनी केली.

दरम्यान, तेजस्वी प्रसाद यादव यांनी महाघाडीच्या सदस्यांचे आभार मानले असून, आपण त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहू अशी भावना व्यक्त केली आहे.

**<><><><>**

देशभरात आज भाऊ बहिणीचं नातं दृढ करणारा भाऊबीजेचा सण आनंदात साजरा केला जात आहे. दिवाळीच्या पाचव्या दिवशी येणारा हा सण भाईदूज, यम द्वितीया, भाई टीका या नावानंही ओळखला जातो. आजच्या दिवशी बहिणी आपल्या भावाच्या दीर्घायुष्याची कामना करत भावाचं औक्षण करतात. तर ओवाळणी म्हणून भाऊ बहिणींना त्यांचं संरक्षण करण्याचं वचन देतात.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सर्व देशवासियांना भाऊबीजेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. भावाबहिणीच्या अतूट नात्याचं प्रतीक असलेला हा सण प्रत्येकाच्या जीवनात आनंद आणि समृद्धी घेऊन येतो, असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. बहीणभावाचं हे नातं आणखी दृढ होत राहो, अशी कामना त्यांनी केली आहे.

दरम्यान, भाऊबीजेनिमित्त होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेत बेस्ट प्रशासन आज मुंबई आणि परिसरात १३४ अतिरिक्त बसेस चालवणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही भाऊबीजेनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><>**

भाऊबीजेच्या दिवशी प्रथेनुसार उत्तराखंडमधल्या यमुनोत्री आणि केदारनाथ धामची कवाडं आज विधिवत बंद करण्यात आली.  यानिमित्तानं मंदिरावर रोषणाई तसंच मंदिरात फुलांची आरास करण्यात आली होती. बाबा केदारनाथ आज वाजत गाजत मुरवणुकीने उखीमठ इथल्या ओंकारेश्वर मंदिरात निवासाकरता रवाना झाले. या मोसमात १७ लाख ६८ हजार ७९५ यात्रेकरूनी केदारनाथाचं दर्शन घेतलं. येत्या शनिवारी केदारनाथांची पालखी उखीमठच्या ओंकारेश्वर मंदिरात पोहचेल तिथे ६ महिने त्यांचा मुक्काम असेल.

<><><><>

सध्याच्या सणासुदीच्या निमित्ताने भारतीय रेल्वेने गेल्या काही दिवसांपासून विशेष रेल्वे गाड्या चालवल्या आहेत. येत्या ३१ तारखेपर्यंत नियमित रेल्वे गाड्यांखेरीज देशभरात दीड हजार विशेष रेल्वे गाड्या चालवण्यात येणार आहेत. आज देशभरातल्या विविध स्थानकांवरून २९५ विशेष गाड्या सोडल्या जात आहेत. गेल्या २१ दिवसांत भारतीय रेल्वेने ४ हजार ४९३ विशेष गाड्या चालवल्या आहेत.

<><><><>

महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या साखळी फेरीत, आज भारत आणि न्यूझीलंड यांच्यात सामना होणार आहे. नवी मुंबईच्या डॉ. डी. वाय. पाटील क्रीडा अकादमीच्या मैदानावर दुपारी ३ वाजता हा सामना सुरु होईल.

गुणतालिकेत दोन्ही संघांनी प्रत्येकी ५ सामन्यांमधून ४ गुणांची कमाई केली आहे. त्यामुळे स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश करण्याच्या दृष्टीनं हा सामना दोन्ही संघासाठी महत्त्वाचा असणार आहे.

दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडच्या संघानं यापूर्वीच उपांत्य फेरीतलं स्थान पक्कं केलं आहे.

<><><><>

भारत आणि ऑस्ट्रेलियातल्या तीन एकदिवसीय क्रिकेट मालिकतेल्या, ॲडलेड इथं सुरू असलेल्या दुसऱ्या सामन्यात भारतानं ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी २६५ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

या सामन्यात ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या भारताची सुरुवात खराब झाली. सातव्या षटकातच कर्णधार आणि सलामीवर शुभमन गील ९ धावांवर, तर विराट कोहली शुन्यावर बाद झाला. त्यानंतर माजी कर्णधार रोहीत शर्मा आणि श्रेयस अय्यर यांनी तिसऱ्या गड्यासाठी ११८ धावांची भागिदारी करत भारताचा डाव सावरला.

रोहीत ७३ तर श्रेयस ६१ धावांवर बाद झाला. अक्षर पटेल यानंही ४४ धावांचं मोलाचं योगदान दिलं.

ऑस्ट्रेलियाच्या वतीनं ॲडम झाम्पा यानं ४, बार्टलेट यानं ३, तर मिशेल स्टार्क यानं २ गडी बाद केले.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा ऑस्ट्रेलियानं दुसऱ्या षटकात बिनबाद ४ धावा झाल्या होत्या.

मालिकेतला पहिला सामना ऑस्ट्रेलियानं जिंकला आहे, तर तिसरा सामना येत्या २५ तारखेला सिडनी इथं होणार आहे.

<><><><>

भारताचा ऑलिम्पिक पदक विजेता नेमबाज अभिनव बिंद्रा यांना पुढच्या वर्षी होणाऱ्या हिवाळी ऑलिम्पिक स्पर्धेचा मशालवाहक म्हणून निवडण्यात आलं आहे. ही स्पर्धा पुढच्या वर्षी ६ ते २२ फेब्रुवारी या दरम्यान इटलीत मिलान आणि कोर्टिना डी अमपेत्झो इथे होणार आहे. या स्पर्धेसाठी मशालवाहक म्हणून आपली निवड होणं हा आपला सन्मान असल्याची भावना बिंद्रा यांनी आपल्या समाज माध्यमावर व्यक्त केली आहे.

<><><><>

कबड्डीमध्ये, भारताने काल इसा स्पोर्ट्स सिटी हॉल येथे झालेल्या तिसऱ्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धेत मुलांच्या सामन्यात यजमान बहरीनचा 84-40 असा पराभव केला. इशांत राठीच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने सलग पाचवा सामना जिंकून विजयी घोडदौड सुरू ठेवली. यासह, भारताने गुणतालिकेत आघाडी घेतली आहे आणि अंतिम सामन्यात स्थान निश्चित केले आहे.

//<><><><>//